



# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक १८१ वा ❑ गुरूवार दि.०४ सप्टेंबर २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)




संपूर्ण महाराष्ट्रात श्री महालक्ष्म्या खूप उत्साहात साजऱ्या केल्या जातात व महालक्ष्मी समोर उत्कृष्ट देखावा केला जातो. सौ ज्ञानेश्वरी व्यास, राक्षसभुवन (शनीचे) यांच्याकडील हा उत्कृष्ट देखावा. (मो.9373031853)

## विशेष लेख...

## भारत विरोधात कांगावा करणाऱ्या अमेरिकेचा युक्रेनला शस्त्रपुरवठा

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय 📖 साहित्य

रशियन तेल खरेदी करून भारत युद्ध सामग्रीला वित्त पुरवठा करतो असा कांगावा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प करत आहे आणि यावरूनच ट्रम्प यांनी भारतावर ५०% टेरिफ लावलेला आहे. रशियाकडून तेल खरेदी प्रकरणी अमेरिकेने भारतावर ५० टक्के तारीख लागू केले त्यामुळे दोन्ही देशात सध्या तणाव आहे. भारत रशियाकडून तेल खरेदी करून एक प्रकारे रशियाला मदत करत आहे त्याचप्रमाणे युक्रेनला देखील मदत करत आहे असा कांगावा ट्रम्प करत आहे मात्र कदाचित विसरले असेल की अमेरिकेने युक्रेनला शस्त्र सरांचा पुरवठा केलेला आहे.

अमेरिका युक्रेनला लष्करी मदत देत आहे, जरी अलीकडेच काही शस्त्रास्त्रांचा पुरवठा थांबवण्यात आला असला तरी ट्रम्प युक्रेनला शस्त्र विकण्यास अनुकूल आहेत.बायडेन प्रशासनाने २०२५ च्या सुरुवातीपर्यंत युक्रेनला मोठ्या प्रमाणात लष्करी मदत दिली होती आणि जरी निवडून आलेले राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी युक्रेनला पुढील लष्करी मदतीला विरोध केला असला तरी, युक्रेनच्या संरक्षणाने युद्धात महत्त्वाची भूमिका बजावली आहे आणि भविष्यातील मदतीबाबत निर्णय अजूनही येत आहेत.

रशिया आणि युक्रेनमधील युद्धाला ३ वर्षांहून अधिक काळ लोटला आहे. २४ फेब्रुवारी २०२२ रोजी जेव्हा हे युद्ध सुरू झाले तेव्हा असे वाटत होते की रशिया काही दिवसांतच जिंकेल. तथापि, अद्याप असे घडलेले नाही. रशियन हल्ल्यांमुळे युक्रेनमध्ये बरीच विनाश झाली आहे. इतकेच नाही तर युक्रेनमध्ये मोठ्या प्रमाणात जीवित आणि मालमत्तेचे नुकसान झाले आहे. रशियन हल्ल्यांमुळे अनेक युक्रेनियन शहरांचे मोठे नुकसान झाले आहे. तथापि, युक्रेनला सतत मिळत असलेल्या आंतरराष्ट्रीय पाठिंब्यामुळे, युक्रेनियन सैन्य अजूनही रशियन सैन्यासमोर उभे आहे. या कारणास्तव, रशियन सैन्याने युद्धात अनेक सैनिक गमावले आहेत. या युद्धात युक्रेनला आतापर्यंत अमेरिकेकडून सर्वाधिक पाठिंबा मिळाला आहे. जो बायडेन यांच्या कार्यकाळात अमेरिकेने युक्रेनला भरपूर लष्करी मदत केली आहे. डोनाल्ड ट्रम्प अमेरिकेचे अध्यक्ष झाल्यानंतर युक्रेनची चिंता निश्चितच वाढली होती आणि काही काळासाठी त्यांनी युक्रेनला दिलेल्या शस्त्रांवरही बंदी घातली होती, परंतु आता ट्रम्प यांनी ती बंदीही उठवली आहे.

ट्रम्प बऱ्याच काळापासून दावा करत आहेत की ते रशिया आणि युक्रेनमधील युद्ध संपवतील, परंतु अद्याप असे झालेले नाही. ट्रम्प यांनी अनेक वेळा असेही म्हटले आहे की ते या युद्धात युक्रेनला अधिक शस्त्रे देणार नाहीत, परंतु पुन्हा एकदा अमेरिकेने युक्रेनसाठी शस्त्रे खरेदी करण्याचे दरवाजे उघडले आहेत. अशा परिस्थितीत, ट्रम्प यांचे दावे पुन्हा एकदा निष्फळ ठरले आहेत असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही.

ट्रम्प यांनी काही दिवसांपूर्वी युक्रेनला पॅट्रियट एअर डिफेन्स सिस्टीमसह इतर महत्त्वाची शस्त्रे पुरवण्यास हिरवा कंदील दिला होता. आता एका अमेरिकन तज्ज्ञाने याबद्दल चिंता व्यक्त केली आहे. कोलंबिया विद्यापीठातील सेंटर फॉर सस्टेनेबल डेव्हलपमेंटचे संचालक आणि प्रसिद्ध अमेरिकन आर्थिक तज्ज्ञ जेफ्री सॅक्स यांनी म्हटले आहे की अमेरिका ज्या पद्धतीने युक्रेनला शस्त्रे देत आहे, त्यामुळे विनाश वाढेल. यामुळे या युद्धात आणखी लोकांचा मृत्यू होईल

युद्धाच्या सुरुवातीपासून जानेवारी २०२५ पर्यंत बायडेन प्रशासनाने युक्रेनला १ अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त लष्करी मदत दिली. शस्त्रे या मदतीत हिमार, तोफखाना, टँक, हवाई संरक्षण प्रणाली आणि इतर उपकरणे समाविष्ट होती. हे लक्षात घेण्यासारखे आहे की फेब्रुवारी २०२२ मध्ये रशिया-युक्रेन युद्ध सुरू झाल्यापासून अमेरिकेने युक्रेनला ६६ अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त लष्करी मदत आणि शस्त्रे दिली आहेत.

राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या आगमनानंतर, परराष्ट्र सचिव मार्को रुबियो यांनी घोषणा केली की अमेरिका यापुढे युक्रेनला मोफत शस्त्रे किंवा आर्थिक मदत देणार नाही, परंतु शस्त्रे विकणार.याचा अर्थ हाच की अमेरिका युक्रेनलाच नव्हे तर जगातील कोणत्याही देशाला शस्त्र विकत असते शस्त्र विकणे म्हणजे एक प्रकारे युद्धखोरीला आमंत्रण देणे नव्हे काय? युक्रेनला अमेरिकेने शस्त्रास्त्रांची मदत केलेली आहे आजही अमेरिका शस्त्र विक्रीचा पर्याय समोर ठेवलेला आहे. या शास्त्रांचा वापर युक्रेन रशियाच्या विरोधात करत आहे पुढेही करत राहणार..

राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी वाटाघाटीद्वारे शांतता तोडग्यावर आग्रह धरला असला तरी, भविष्यात युक्रेनला अमेरिकेच्या कोणत्याही मदतीचे स्पष्ट चित्र अद्याप नाही.

## गुरु ईश्वर तात माय गुरुविन जगी थोर काय

ज्योतिर्मय 📖 साहित्य

गुरुवेन नम: गुरुवेन नम: अनादि काळापासूनच शिक्षकाला समाजात मानाचे स्थान आहे. त्यांना आचार्य, गुरुजी, टीचर अशा अनेक नावांनी संबोधित केले जाते. त्या नावाला साजेशी अशी आपली विद्यार्थ्यांसमोर ओळख निर्माण करणे आवश्यक आहे. उदा. तुम्ही विद्यार्थ्यांच्या भावभावनांना कसे जपता, स्वत:चे अध्यापन कौशल्य वापरुन विद्यार्थ्यांच्या मनात स्व ची जाणीव कसे निर्माण करू शकता? त्यांच्यात आपलेपणाचा भाव कसा निर्माण करु शकता? अशी ही विद्यार्थी व शिक्षक यांचेतील आंतरक्रिया वाढीस लागून जिव्हाळ्याचे नात निर्माण होत आणि काही प्रशासकीय कारणास्तव त्यांना न सांगता त्यांच्यातून निघून जातो. मग त्यांचे मनावर विपरीत परिणाम होतो. हे त्यांना त्या बालवयात व्यक्त करता येत नाही.त्या बालमनावर तुम्ही इतके काही कोरुन ठेवलेले असते की, ते तुम्हाला विसरुच शकत नाही. मग त्या वयात तुमच्या प्रतिमेस हृदयाच्या कोपऱ्यात जपून ठेवतात व सदोदित तुमच्या आठवणीत रमतात. कारण बालमन असलेने त्यांना कोणतेही निर्णय घेता येत नाही. योग्य वय व योग्य वेळ आलेनंतर पंखातील बळाच्या जोरावर त्यांची शोध मोहिम सुरु होते. एवढ्या प्रयत्नांनंतर त्यांना हरवले ते गवसते. तो आनंद त्यांना गगनात मावेनासा होतो. परंतु आपण शिक्षक या नात्याने विचारात पडतो व विचारांच्या कालचक्रात जाऊन आपली शोध मोहिम सुरु करतो. कारण त्याचे विद्यार्थी दशेतील चेहरे आणि आपण पन्नासीतले. असो, आज त्यानिमित्ताने का होईना पूर्वाश्रमीच्या आयुष्यात डोकावते. अन् हळूच एक एक पान उलगडले.

३० नोव्हेंबर १९९३ चा शाळेचा पहिला दिवस. कोरेगावातील बनवडी शाळेतील पहिलं पहिलं पाऊल. अत्यंत आनंदी मनाने कार्यालयात प्रवेश केला. मुख्याध्यापक पाटील गुरुजींनी नवनियुक्त शिक्षक म्हणून स्वागत केले. सगळ्यांच्या स्वागतांचा स्वीकार केला अन् त्यांनी इयत्ता चौथीचा वर्ग ताब्यात दिला. वर्गातील विद्यार्थ्यांनी टाळ्या वाजवून स्वागत केले. नवीन गाव, नवीन शाळा, नवीन लोक, नवीन अनुभव व नवीन विद्यार्थी. सगळेच कसे नवीन नवीन. इटुकल्या पिटुकल्यांना पाहून मन अगदी आनंदून गेल होत. या पिलांची ओळख परेड, गाणी व गोष्टी करतच तो दिवस कधी संपला ते कळलंच नाही. अशाच आनंदमयी



वातावरणात ते एक वर्ष भरकन निघून गेलं. त्यानंतर बरोबर ३० वर्षांनी अचानक फोन आला. ओळखलंत का मला? मनात थोडे प्रश्न निर्माण झाले. कोण असेल बरे. विचारात असतानाच



सौ.वैशाली जनार्दन कदम (कणसे)
शाळा जावली, ता. महाबळेश्वर,
जि.सातारा, मो. -9423484216

समोरील व्यक्ती म्हणाली, मी शरद. तुमचा विद्यार्थी बनवडीतला. मी पुन्हा भूतकाळात डोकावून पाहिले. आठवले ते निरागस व अनेक बालिश चेहरे. परंतु नक्की कोण ते कळेना? परंतु तरी देखील संवाद चालू ठेवला व माझ्या भेटीसाठी गेट टुगेदर हा सर्व शिक्षकांसाठी कार्यक्रम आखला. परंतु त्या कार्यक्रमास मला जाता आले नाही. त्यामुळे त्यांनी सर्वांनी मला भेटण्याचा दिवस ठरविला व ठरविल्याप्रमाणे सर्वजण आपली कामे बाजूला ठेवून घरी पोहचले. माझ्या मनात अनेक प्रश्न होते. ही मुले कसे दिसत असतील? त्यांना पाहिल्यानंतर काय बोलायचे? पण त्यांच्यातील एक चाणाक्ष व सर्वांचा लाडका पुढे सरसावला, व तो सर्वांची ओळख करुन देऊ लागला. मी शरद दळवी.माझा स्वत:चा व्यवसाय आहे,ही तुमची लाडकी निलम ची तयारी करते सोबतच शिक्षिका आहे. हा विशाल, तो डॉक्टर, कोणी सरपंच, सर्वजण कसे आधुनिक काळानुसार बदल करून स्वत:चे व्यक्तिमत्त्व घडविण्यात व्यस्त होते परंतु तरी देखील वेळात वेळ काढून खास कणसे बाई यांना भेटणेसाठी आले होते. अशा दुर्मिळ क्षणांचा मेळ जुळुन येत असतो की, ते आपल्या स्मरणात राहतात. मलाही कधी वाटले नव्हते की,अशी पाखरे उडत उडत आपल्याला शोधत येतील. मी या बागेत *फक्त एकच वर्ष* मेहनत घेतली परंतु या माझ्या लेकरांनी मला आयुष्य पुन्हा नव्याने जगायला शिकविले.आज त्यांचेतील निडरता, एकी व बुध्दीकौशल्य पाहून मन एकदम ताजेतवान झाले. आणि वाटले, अजूनही चांगले विद्यार्थी घडविण्याचे काम बाकी आहे याची जाणीव निश्चितच या विद्यार्थ्यांनी करुन दिली. या सर्वांकडून नवीन चेतना, प्रेरणा व ऊर्जा घेऊन नव्या उमेदीने पुन्हा नव्या विद्यार्थ्यांसाठी विद्येचे शस्त्र घेऊन तयार सज्ज झाले.

मुलांनो, तुमची ही आठवण कायम मला राहील. असेच भेटत रहा. तुम्हां सर्वांच्या जीवनात आनंद, प्रेम व सौख्य नांदत राहो.

## वास्तुशास्त्र पेंटिंग

लघुलेख-३४




*मानव आणि वनस्पती यांच्यामध्ये भाव-भावना असतात, हे विधान खर तर आता पटायला हरकत नसावी. कांही जणं म्हणतात, "अहो मानवी भावभावना, वनस्पती मध्ये कशा काय असु शकतात? त्यांचा आणि मानवाचा संबंध कसा काय असू शकतो?" याचे उत्तर पुढील माहिती वाचल्यानंतर मिळु शकेल.*

*वृक्षांमध्ये आकाश तत्व आहे कारण ते फुले - फळे देतात. उष्णतेमुळे वृक्षांची पाने, फुले, फळे सुकतात मलूल पडतात, जळतात देखील. वणवे लागतात, जंगलांना आग लागते. त्या अर्थी त्यांना स्पर्शेंद्रिये आहे. विज पडून, विजांच्या गडगडाटाने वृक्षांची फूले-फळे-पाने गळून पडतात. यावरून त्यांना श्रवणेंद्रिय आहे. वेली व परावलंबी वनस्पती दूरवरील वृक्षाला, विजेच्या खांबाला, इमारतीच्या जवळ जाऊन विळखा घालतात, त्यावरून त्यांना दृष्टि आहे. दुर्गंध, धूप, यांचा परिणाम होवून वृक्षांना फळे, फुले येऊन ते निरोगी, आहेत. कुठल्याही वनस्पतीची मुळे खोलवर जाऊन स्वत:च्या वाढीला निरोगी राहतात. त्याअर्थी त्यांना घ्राणेंदिय आहेत. कुठल्याही वनस्पतींची मुळे खोलवर जाऊन स्वत:च्या वाढीला लागणारे पाणी खेचून घेतात. म्हणजे त्यांना रसनेंद्रिय आहे, तोडली असता ती पुन्हा फुटतात कारण त्यांच्या मध्ये चेतनाशक्ती आहे. वृक्ष, पाणी शोषून घेतात. त्याव्दारे ते सूर्यप्रकाश (उर्जा/उष्णता) व कार्बन (वायू) घेऊन वाढतात. या साऱ्या निरिक्षणांव्दारे केलेल्या संशोधनांचा विचार करता, आपल्याला एक गोष्ट मान्य करायला हवी की वनस्पतींना मानवा प्रमाणे भाव-भावना असतात. आणि हेच शास्त्रज्ञांनी सिद्ध केलेल आहे - जे भृगु ऋषींनी ५००० वर्षापूर्वीच लिहुन ठेवलेले आहे.*

*वरील माहितीवरून आपल्या ध्यानात येईल की, वनस्पती आणि मानव यांच्यामध्ये नैसर्गिक - वैश्विक संबंध आहे. परिस्थितीशी तडजोड करणं- स्वत:ला सामावून घेणं, हे जसं त्या त्या क्षेत्रातील वनस्पतींना जमलं... त्यांची यादी, नक्षत्रां सोबत निश्चित केलेली आहे. त्यावरून, त्या त्या नक्षत्राचा 'आराध्य वृक्ष'. निश्चित केलेला आहे. तो 'आराध्यवृक्ष', त्याचे 'पंचांग', हे आपल्या वास्तुशास्त्र पेंटींगचे"आयकॉन"आहे.*

क्रमश:.....

द्वारा एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान
डॉ. गजानन शेपाळ : 98691 30238



# जात्यावरच्या ओव्या......

---


भाऊ करते व्याही
बाप मनात हसला
हंड्या घंगाळ्याचा
टांगा वाळूत फसला ||२४१||

गोरं माझं रूप
रूपा सारखी घेना साडी
पेठ कोल्हापूर
सुरतेचा मारवाडी ||२४२||

---

संदर्भ - शांताई इंगळे
संकलन - सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

# श्री गणेशाला दुर्वा प्रिय का... ?




विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

ज्योतिर्मय साहित्य


ते ऐकून इंद्रही विचारात पडला.

त्याने आपला सेवक तिच्यासोबत देऊन तिला कुबेराकडे पाठवले. कुबेराने आपल्या परीने प्रयत्न करून पाहिला. त्याच्या भांडारातील सर्व सोने एका पारड्यात टाकले तरी दुर्वांचे पारडे जडच होते. त्याने मग सर्व देवांना पाचारण केले. इंद्र, कुबेर, विष्णू, शंकर आदी सर्व देव पारड्यात बसले तरी दुर्वांचे पारडे जडच होते. यामागे नक्कीच काहीतरी अर्थ असणार ही जाणीव इंद्राला आणि श्री विष्णूला झाली. आणि ते आश्रयासह कौंडीण्य ऋषींच्या आश्रमात आले. त्यावेळी ऋषींनी त्यांना दुर्वांची महती कथन केली आणि सांगितले की गणेश हा त्रैलोक्याचा स्वामी असून त्याच्याहून किंवा त्याने धारण केलेल्या कोणत्याही गोष्टीपेक्षा काहीही श्रेष्ठ नाही.



श्री गणेशाशी संबंधित असलेल्या सर्व गोष्टी या प्रतिकात्मक आहेत. त्या प्रत्येक गोष्टीमागे काहीतरी संदेश आहे. अनलासुर हा राग, लोभ आदि षड्रिपूंचे प्रतिक आहे. त्याचा नाश गणपतीने केला. त्यांचा नाश करण्यासाठी किंवा देवतेला प्रसन्न करण्यासाठी तपश्चर्या करावी लागते. तपश्चर्या करताना अंगात उष्णता निर्माण होते. ती उष्णता कमी करण्यासाठी दुर्वांचा उपयोग होतो. दुर्वा या एकवीस का वाहाव्यात किंवा एकवीस या संख्येचे काय महत्व आहे ? तर पृथ्वीवर सात खंड आहेत. सात समुद्र आहेत. सात वार आहेत. शरीरातही सप्त धातू आहेत. विवाहातही सप्तपदी आहे. आणि सत्व, रज आणि तम हे तीन गुण आहेत. या साताला तीनने गुणले की उत्तर एकवीस येते. श्री गणेश हा सत्व, रज आणि तम या त्रिगुणांच्या पलीकडे असलेले दैवत आहे. कालही तीन आहेत. वर्तमान, भूत आणि भविष्य. श्री गणेश हा आदिदेव. तो या सगळ्यांच्या पलीकडे. पृथ्वी, आकाश आणि पाताळ हे ही तीन लोक तो व्यापून उरला आहे. मानवी शरीराच्या तीन अवस्था आहेत. जन्म, जरा आणि मृत्यू. अशा या सगळ्या प्रतीकात्मक गोष्टी.

दुर्वा या श्रीमंतापासून गरीबांपर्यंत सर्वांना सहज उपलब्ध होतील अशा आहेत. अलीकडे चांदीच्या दुर्वा पण श्री गणेशाला वाहिल्या जातात. पण खऱ्याखुऱ्या दुर्वाच श्री गणेशाला जास्त प्रिय आहेत. दुर्वा म्हणजे दिसायला गवत किंवा हरळी. पण त्यांचे महात्म्य मोठे. तेव्हा या गणेशोत्सवात गणपतीला प्रिय असणारे मोदक तर वाहू या, प्रसाद म्हणून भक्षण करू या पण दररोज कमीत कमी एकवीस दुर्वांची एक जुडी आणि प्रिय असणारे जास्वंदीचे फुल तरी श्री गजाननाला भक्तिभावे अर्पण करू या.



दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# शुध्दज्ञान निरूपण

ज्योतिर्मय साहित्य

नमस्कार ,

समर्थांनी एकुण ७५ ओव्या मध्ये हा समास गुंफला आहे पण माझ्या सारख्या अल्पबुद्धिच्या मनाला जसा भावला तसा लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. कारण प्रत्येक शब्द गहन असे तत्वज्ञान सांगुन जाते. विचार करायला लावते.

आत्मा ब्रम्हस्वरूप किंवा परमात्मा स्वरूपात आहे. आणि आपण सगळे आत्मस्वरूप आहोत. मी देह नसून आत्माच आहे आणि आत्मा ब्रम्हस्वरूप असल्याने मी ब्रम्हस्वरूप आहे. असा प्रत्यक्ष अनुभव येतो म्हणजे आत्मज्ञान प्राप्त झाले असे समजावे.


या ज्ञानाला शुद्ध व निर्मळ स्वरूपज्ञान म्हणतात. हे ज्ञान अति सुक्ष्म विचाराने आपल्यमध्येच उदय पावते व त्याच्यमध्ये सर्व विरोध मावळतात.

एका मूळस्वरूपातून हे सारे विश्व व्यक्तदशेला येते व पून्हां त्याच स्वरूपात ते लय पावते.म्हणजेच उगम होणे व लय पावणे हा तर स्रुष्टीचा नियम आहे. आत्मस्वरूपाचे ज्ञान झाले की अज्ञात नाहींसे होते. मग आपण बांधले गेलो आहोत. असा अज्ञानातून निर्माण होणारा भ्रम नाहींसा होतो. आपण विश्वापेक्षादेखील विशाल असतांना स्थळकाळांनी वेढल्यामुळे जणूंकाय बद्ध आहोत.

संपूर्ण विश्व स्वरूपांत लीन झाले एकरूप झाले मी तू पणाचीभावना मागे सरली हे जेव्हा समजते तेव्हा आत्मज्ञानी पुरूषाला बद्धपणाची भावना उरत नाही. स्वस्वरूपाचा प्रत्यक्ष अनुभव येईपर्यंत अनेक मते आणि मतांतरे यामध्ये विरोध आढळतो. पण आत्मज्ञान झाल्यावर हा विरोध मावळतो. अतिशय सुक्ष्म विचार केला तर सर्वत्र एकमेकांना समजून घेण्याची भावना वाढीस लागली तर सर्व सर्व विरोध मावळतो.

(क्रमशः)

# नाम आणि सत्कर्म



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

नाम हा सत्कर्माचा पाया आहे तसाच कळसही आहे. भगवंताच्या स्मरणात केलेले कर्मच सत्कर्म या सदरात पडू शकते; भगवंताच्या विस्मरणात केलेले कर्म सत्कर्म ठरू शकत नाही. समजा, एखादा मनुष्य नुसते तोंडाने ' राम, राम ' म्हणतो आहे परंतु भगवंताच्या स्मरणात नाही, तर मग ' राम, राम ' म्हणण्याची त्याची क्रिया सत्कर्म म्हणता येईल का ? वास्तविक, नाम हे स्वत:सिद्ध असल्याने ते जाणता वा अजाणता म्हटले तरी ते सत्कर्म याच सदरात पडते, कारण ' जेथे माझे नाम तेथे मी पुरुषोत्तम ' असे भगवंताचेच वचन आहे. म्हणून नामाचा उच्चार आणि भगवंत या दोन गोष्टी निराळ्या असूच शकत नाहीत. मुखाने नाम म्हणणाऱ्याचे लक्ष भगवंताकडे असो वा नसो, ते सत्कृत्य याच सदरात पडते. इतर कर्मे आणि नाम घेण्याचे कर्म यांत जो मोठा फरक आहे तो हाच की, इतर कर्मांना पूर्णत्व किंवा सत्यत्व नामाने येते, तर उलटपक्षी नाम आणि अपूर्णत्व या गोष्टी एकत्र संभवतच नाहीत. म्हणून नाम भगवंताच्या स्मरणात घेतले किंवा कसे हा प्रश्नच उद्भवत नाही. किंबहुना, नाम मुखी आले की सत्कर्मे होऊच लागतात. मूल झाले की मुलाच्या आईला पान्हा फुटणे, मुलाचे लाड करणे, त्याच्यावर सर्वतोपरीने प्रेम करणे, या गोष्टी जशा न शिकविता सहजच होतात, तशीच स्थिती नाम घेणाऱ्याची सत्कर्माच्या बाबतीत होते. इतकेच नव्हे तर, त्या आईला जर म्हटले की तू मुलाला जवळ ठेव, पण त्याच्यावर प्रेम वगैरे काही करू नकोस, तर ते जसे तिला शक्य नाही, त्याचप्रमाणे नाम घेणाराला सत्कर्मे टाळू म्हटले तरी टाळता येणार नाहीत. सत्कर्मे फळाला आली असे केव्हा म्हणता येईल, तर भगवंताचे नाम मुखी येईल तेव्हाच.

परमात्म्याने आपल्याला सांगून ठेवले आहे की, " तू माझा व्हावास असे तुला वाटते आहे ना ? मग तू प्रपंच अती दक्षतेने कर, प्रयत्नाला कधी मागे पाहू नकोस, पण फळ देणारा मी आहे ही भावना ठेवून तू वाग. जी परिस्थिती येईल त्यात समाधान बिघडू देऊ नकोस, आणि मी जे सांगतो ते औषध घे, ते तुला सर्व रोगांतून मुक्त करील; आणि ते औषध जर कोणते असेल तर ते माझे ' नाम ' हे होय. " त्या नामाचा खरोखर तुम्ही अभ्यास करा. तुम्ही सर्वांनी असा निश्चय करा, की नामाशिवाय जगणे हे खरे नाही. नामाशिवाय जगू नये असे मला खरोखर मनापासून वाटते. नामावरची निष्ठा कसे काम करते हे निष्ठेने नाम घेणारालाच कळेल. नामाचे प्रेम ज्याला लागले त्याच्या मागे परमात्मा उभा राहिला हे अगदी सत्य, सत्य, त्रिवाचा सत्य सांगतो. म्हणून आवडीने आणि प्रेमाने भगवंताचे नाम घ्या, एकदा तरी त्याला कळकळीने 'रामा! ' अशी हाक मारा, की भगवंताला तुम्हाला येऊन भेटावेसे वाटले पाहिजे.

सत्कर्माचा शेवट भगवंताच्या नामाचे प्रेम उत्पन्न होण्यातच होणे जरूर आहे.

# ॥ संत महात्म्य ॥

लेखक - मधुकर बोरीकर
9403061886

## जगद्गुरु संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांचा अभंग

ज्योतिर्मय साहित्य

म्हणूनच आपण देवाला नैवेद्य दाखवताना, जरी अन्नपदार्थ पुढे ठेवीत असलो तरीही, म्हणताना प्राणाय स्वाहा:,अपानाय स्वाहा:,उदानाय स्वाहा: समानायस्वः ओम ब्रह्मणे नमः असे म्हणतो. म्हणजे खरी आहुती भगवंताला या पंच प्राणाची चालते. या पंच प्राणाच्या यज्ञ कुंडातील आहुतीने सर्व शरीर भर योगग्नी पसरतो. प्राण वर सहस्त्रार चक्राकडे सरकायला लागला की मनाची चुळबूळ कमी व्हायला लागते. मनात विचारांचा उदभव कमी कमी होत जातो. मन शांत, निष्पंद, निरामय अवस्थेत येते व हळूहळू विचार शून्यता घेऊन उन्मनी अवस्थेकडे वाटचाल होते. असे निर्विचार मन बुद्धीत वळते व बुद्धी आकुंठित होऊन आंत्म्याकडे वळते. बुद्धीचे अकुंठण याचसाठी की त्यावेळेस विषय, व्यक्ती व वस्तू याविषयी कल्पनेचे धुमारे फुटणे बुद्धी थांबवते व ती दृढतेने आत्म्याकडे वळते. या काळात या प्रचंड योगग्नि मुळे सर्व शरीर जाणीव रहित होते. म्हणूनच प्रेत रूप भाव झाला, असे तुकाराम महाराज सांगतात. शरीर हे जाणीव रहित झाले. जणू काय प्रेत आहे. इतपत वैराग्याचा संचार किंवा अहंकाराचे लीन होणे ही अवघड स्थिती प्राप्त होते.

यावेळेस शरीरात प्रचंड योगग्नि पेटलेला असतो. पाठीचा कणा तापून लाल होणे इतपत स्थिती येते.

ज्ञानेश्वर माऊलींनी स्वतःच्या पाठीवर या पेटलेल्या योगग्नि मुळेच मांडे भाजून घेतले होते.

मांडे भाजण्यासाठी (समजण्या पुरते यास भाकरी भाजण्यासाठी पुरते, असेही समजू शकतो) यासाठी तापमान दीड हजार वॅट इतके प्रचंड लागते. यावरून ज्ञानेश्वर माऊलीच्या शरीरात योगग्नि किती प्रखर होता, हे लक्षात येईल.

या योगग्नी मध्ये विकारांची बीजे जळून नष्ट होतात. म्हणून काम, क्रोध, माया या रडतात कारण या योगाग्नीत जळून भस्म होत आहेत असे तुकाराम महाराज सांगतात.

ज्यावेळेस प्राण उर्ध्वरेता असतो अहंकार लिन होतो. मन मृतप्राय होते, व ते बुद्धीत विलीन होते. बुद्धी कुंठीत होऊन आत्म्याकडे वळते. विकारांची बीजे समुळ नष्ट होतात. त्या वेळेसच आत्म्या भोवतीचे मळभ नाहिसे होऊन, दैदीप्यमान आत्म्याचा प्रकाश बुद्धीत पडतो व बुद्धीत विवेकाचा जन्म होतो. आत्म्याचा अनुभव घेणे, यालाच ज्ञानप्राप्ती असे म्हणतात. पण ही स्थिती केवळ गुरु कृपेतून व गुरूच्या मार्गदर्शनाखालीच येत असते. यावेळेस मृत्यूचे भय असतेच असते. सद्गुरु त्यातून साधकाचे रक्षण करतात. म्हणून तुकाराम महाराज म्हणतात *म्हणती हाय हाय यमधर्म* असे म्हणतात. तुकाराम महाराज यांचे गुरु त्यांना केवळ स्वप्नात भेटले व त्यांची कुंडलिनी जागृत करून निघून गेले. प्रत्यक्ष या अनुभवाचे वेळी जरी गुरु हजर नसले तरी दिव्य स्थानातून ते या स्थितीचे निश्चितच साक्षीदार असावेत.

वैराग्याच्या शेणी लावल्या शरीरी ज्ञानाग्नी भरभरा ब्रह्मत्वेसी /
फिरविला घट फोडीला चरणी महावाक्ये कानी बोंब झाली

वैराग्याच्या शेणी म्हणजे गोवर्या या प्रेतास जशा लावतात, तसे इंद्रियात वैराग्य दाटले असे महाराज सांगतात. म्हणजे अहंकार हा देह भावाशी संबंधित असतो. तो अहंकार लीन होणे आवश्यक असते. देह भावाची जाणीव संपणे असे झाल्याशिवाय मन बुद्धीत विलीन होत नाही. म्हणून देहभाव संपणे, देहाची जाणीव संपणे हे वैराग्याच्या गोवऱ्या अंगास लावल्या प्रमाणे आहे असे महाराज सांगतात.

जेव्हा योगाग्नी बुद्धीत व्यापतो तेव्हा त्यास ब्रह्मग्णी किंवा ज्ञानग्नी असे नाव प्राप्त होते. या ज्ञानाग्णीच्या संपर्कामुळे ब्रह्म स्थिती प्राप्त होणार असते त्यामुळे तो भरभरा ब्रह्म त्वेशी नेऊन सोडतो असे महाराज म्हणतात.

(क्रमशः)

# ॥ निरूपण ॥



ह.भ.प. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

**अथ श्रीसंस्कृतशारदावन्दनम्।**
**भारती ज्ञानभाषाश्री भारतस्याभिगौरवः।**
**सरस्वतीप्रसादश्च विराजतां मुखे सदा।।९।।**

कविप्रतिभा व ज्ञानभाषेची शोभा माझ्या मुखात नेहमी शोभून दिसावी. भारताचा गौरव असा संस्कृतशारदेचा प्रसाद माझ्या मुखात नेहमी शोभून दिसावा.

**दिवाय नाहमिच्छामि न च राजपदे हितम्।**
**रसराज्ञी रसं दात्री विराजतां मुखे सदा।।१०।।**

मी स्वर्गाची इच्छा करीत नाही. राजपदी माझे हित नाही. तर ही रसेश्वरी, रसदायिनी, माता सरस्वती माझ्या मुखात नेहमी शोभून दिसावी.

**सर्वस्वमस्ति भाषैषा सर्वानन्दकरीश्वरी।**
**एषा मानसहंसश्रीं पालयन्ती सुधालता।।११।।**

ही संस्कृतभाषारूपी शारदा माझे सर्वस्व आहे. ती सर्वांना आनंदित करणारी परमेश्वरी आहे. ती मनरूपी हंसाच्या शोभेचे पालन करणारी अमृतवेल आहे.

**महिमानं कथं वक्तुं समर्थोऽहं भवामि च।**
**अनुभवामि यं नित्यं श्वासेन सह जीवने।।१२।।**

तिचा महिमा सांगण्यास मी कसा समर्थ होवू, की; जो महिमा मी जीवनात श्वासासह नित्य अनुभवत आहे.

# आरोग्य संजीवनी



## द्विदल धान्यांची ओळख

ज्योतिर्मय साहित्य

द्विदल म्हणजे ज्यापासून डाळी तयार केल्या जातात ती धान्ये. या कडधान्यांचा आपण सर्रास वापर कुठल्या ना कुठल्या स्वरूपात मोठ्या प्रमाणावर करीत असतो.

ही धान्ये सर्वसाधारणपणे मधुर तुरट रसाची, कोरडी, वात वाढवणारी, कफपित्तनाशक, मलावष्टंभ करणारी असतात त्यामुळेच भाजीला पर्याय म्हणून रोज कडधान्याची उसळ आहारात योग्य नाही. आठवड्यातून तीन दिवस चालू शकेल.

सर्व धान्यांमध्ये मूग श्रेष्ठ. किंचीत वातूळ आहेत, पण पचायला हलके, कफपित्तनाशक. हिरव्या रंगाचेच मूग उत्तम. मूग शिजवून त्यावरील पाण्यात सैंधव, हिंग, मिरी, पिंपळी, सुंठ घालून जीऱ्यासह तूपाची फोडणी दिली की, मूगाचे कळण किंवा यूष तयार होते. हा यूष अग्निवर्धक, जीभेला चव आणणारा, पाचक, ताकद देणारा असल्याने आजारपणात व नंतरच्या अशक्तपणात उत्तम.

यानंतरचे मूगाखालोखाल वापरण्यास चांगले धान्य म्हणजे मसूर. पचायला हलकी, पौष्टीक, कफ /पित्त /रक्तविकारात उपयुक्त आहे. आहारात त्यामानाने जास्त वापरायला हरकत नाही.

मटकी मधुर रसाची, मलाला बांधिवत्व देणारी, रूक्ष आणि थंड. उष्णताजन्य आजारात पथ्यकर. याचेही कळण करता येते.

कुळीथ उष्ण, रक्त व पित्त दोष वाढविणारा, कफवातनाशक, मुतखडा घालविणारा, सर्दीनाशक, श्वासनाशक, क्रुमीनाशक आहे. उन्हाळ्यात आणि पित्तप्रकृतीच्या लोकांनी जपून वापरावा. कुळीथाचे कळण आमदोष घालविण्यास उत्तम.

वाटाणा गोड, कोरडेपणा आणणारा, फारच वातूड आणि थंड. कच्च्या मटारांनी द्रवमल प्रवृत्ती होते.

चवळी वातुड, कोरडी, पचायला जड, जास्त मल निर्माण करणारी आहे.

पावटा जड, सारक, वातुड, रक्त स्तन्य व मूत्र यांची निर्मिती करणारा आहे.

चणा थंड, कोरडेपणा उत्पन्न करणारा, मलावष्टंभक आणि वातकारक आहे. परंतु कफपित्तजन्य विकार व ज्वर नाशक असल्याने याचे सूप अशा विकारात उपयोगी ठरते. भिजवून भाजलेले चणे चव उत्पन्न करणारे (रुचकर) आणि ताकद देणारे आहेत.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी–चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

# ॥ श्री राम कथा ॥





वक्ते : आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर

ज्योतिर्मय साहित्य

कोणाचा दृष्टांत...

विभीषणहाने तुमच्या शिवाय मी कोणास शरण जावे?

भगवान म्हणतात ना मला शरण आला त्याचे रक्षण मी करतो.कारण जगात शरन्य केवळ मी आहे.स्वतःला वेगळे न समजता मला एकरूप होणे हे शरण होय.

बिभीषण आला.चरणावर मस्तक ठेवले सर्व लोकात तुम्हीच एकमेव शरन्य असेल. मी सर्व सोडून आला.मी लंकेचा परित्याग केला.मी मित्रा सोडले धन सोडले.असा निःसंग होऊन आलो.सर्वांना हे आवडले. रामानी त्यास तुला रावण वधानंतर लंकेच्या गादीवर बसविण्याचे वचन दिले.

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

लक्ष्मण म्हणे तुम्ही असे वचन लगेच द्यायला नको म्हणे. कारण समाज रावण शरण आला तर तुम्ही त्यास मारू शकणार नाही मग याला गादीवर कसे बसविणार?

राम म्हणाले असे झालेच तर मी अयोध्येचे राज्य बिभीषणास देईल.

पुन्हा एकदा सामोपचाराचा प्रयत्न केला पण उपयोग झाला नाही.

समुद्रांनी ३ दिवस वाट पाहूनही दिली नाही शेवटी धनुष्य वर बाण चढविला की घाबरून सह कुटुंब प्रकट झाला. तुम्ही सत्र काढल्या शिवाय प्रकट झाला नाहीत. समुद्र म्हणे मी तुमचा पूर्वज आहे तुम्ही माझे वंशज आहात पण खरे सांगतो तुमची मला लाज वाटते, तुमचे तोंड पाहण्याची लाज वाटते.

(क्रमशः)

# क्रीडा आरोग्य क्षेत्रातील क्रांती : कमलनयन बजाज हॉस्पिटलने सुरु केले पहिले स्पोर्ट्स मेडिसिन सेंटर

**ज्योतिर्मय साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर –** कमलनयन बजाज हॉस्पिटलने मराठवाड्यातील पहिले समर्पित स्पोर्ट्स मेडिसिन सेंटर सुरू करून आरोग्य क्षेत्रात एक मोठे पाऊल टाकले आहे. हे सेंटर शुक्रवार, दिनांक २९ ऑगस्ट २०२५ रोजी मराठवाड्याचे आयर्न मॅन तथा एमजीएम मेडिकल कॉलेजच्या क्रीडा विभागाचे संचालक श्री. नितीन घोरपडे यांच्या हस्ते उद्घाटन होऊन सुरु करण्यात आले, ज्यामुळे या भागातील खेळाडू आणि फिटनेस प्रेमींसाठी हा एक ऐतिहासिक दिवस ठरला.

या प्रगत सुविधा केंद्राच्या स्थापने मागील दूरदृष्टी कमलनयन बजाज हॉस्पिटलचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जॉर्ज नोएल फर्नांडिस आणि वैद्यकीय संचालक डॉ. अजय रोटे यांची असून त्यांनी अशा विशेष वैद्यकीय सेवांची वाढती गरज अधोरेखित केली, जी फक्त क्रीडा-संबंधित दुखापतींवर उपचार करत नाहीत, तर त्याचबरोबर प्रतिबंध, सुनियोजित पुनर्वसन आणि कार्यक्षमता वृद्धीवरही लक्ष केंद्रित करतात.

या स्पोर्ट्स मेडिसिन सेंटरचे नेतृत्व डॉ. केतन वेखंडे, कन्सल्टंट ऑर्थोपेडिक आणि ऑर्थ्रोस्कोपी सर्जन यांच्या हाती असेल, ज्यांना प्रशिक्षित फिजिओथेरपिस्ट आणि पुनर्वसन तज्ज्ञांच्या टीमचे सहकार्य लाभेल. याद्वारे खेळाडूंच्या गरजांप्रमाणे जागतिक दर्जाची आरोग्यसेवा पुरविण्याचे त्यांचे ध्येय आहे. या उद्घाटन सोहळ्याला श्री. शेखर पाटील, क्रीडा संचालक, विभागीय क्रीडा संकुल, छत्रपती संभाजीनगर, महिला आंतरराष्ट्रीय चेस मास्टर श्रीमती तेजस्विनी सागर, एसबीईएस कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक, डॉ. दयानंद आर. कांबळे तसेच कमलनयन बजाज रुग्णालयाचे वरिष्ठ सल्लागार डॉ. मिलिंद वैष्णव या मान्यवर मुख्य पाहुण्यांची उपस्थिती लाभली, शिवाय अनेक प्रख्यात खेळाडू आणि प्रशिक्षकही यावेळी हजर होते. क्रीडा संस्कृतीला प्रोत्साहन देण्यात आणि मराठवाड्यातील खेळाडूंना सर्वांगीण पाठबळ देण्यात या सुविधेचे असलेले महत्त्व या सर्वांनी अधोरेखित केले.

आधुनिक ऑर्थ्रोस्कोपी सेवा, अत्याधुनिक फिजिओथेरपी आणि पुनर्वसन विभाग तसेच अत्याधुनिक परफॉर्मन्स ॲनालिसिस साधनांनी सज्ज असलेले हे स्पोर्ट्स मेडिसिन सेंटर एकाच छताखाली सर्वसमावेशक उपचार देण्याच्या दृष्टीने तयार करण्यात आले आहे. यामध्ये केवळ दुखापतींचे उपचारच नव्हे, तर दुखापतींना प्रतिबंध, कार्यक्षमता वाढ, फिटनेस मार्गदर्शन आणि सेफ-रिटर्न-टू-स्पोर्टस कार्यक्रमांचा समावेश असेल. या केंद्राच्या रूपात कमलनयन बजाज हॉस्पिटलने क्रीडा आरोग्य सेवेत एक नवा मापदंड प्रस्थापित केला आहे, ज्यामुळे नवोदितांपासून व्यावसायिकांपर्यंत सर्व स्तरांवरील खेळाडूंना अधिक सक्षम आणि जलद उपचार मिळण्याची संधी उपलब्ध होणार आहे. मराठवाड्याच्या क्रीडा वैद्यक क्षेत्रातील उणीव भरून काढण्याचा उद्देश ठेवत, तसेच खेळाडू आणि फिटनेस प्रेमी व्यक्तींना जागतिक दर्जाचे उपचार, प्रगत पुनर्वसन आणि प्रतिबंधात्मक धोरणांच्या माध्यमातून सक्षम करण्याच्या दृष्टीने कमलनयन बजाज हॉस्पिटलचे हे केंद्र महत्वाचे ठरणार आहे.



# प.पू.संताजी महाराज जगनाडे

**ज्योतिर्मय साहित्य**

संतानी आपल्या तप व साधनेद्वारे ग्रंथसंपदा निर्माण केली. पण त्यांच्या सतत् संपर्कात असलेले शिष्य आध्यात्मिक ओवीबध्द विचार लेखनिक होऊन लिहित असत. महाभारताचे लेखनिक प्रत्यक्ष श्रीगणेश होते. ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे लेखनिक सच्चितानंद होते. स्वामी रामदासांच्या दासबोधाचे लेखनिक शिषोत्तम कल्याण स्वामी तर जगद्गुरु तुकाराम महारांजाचे लेखनिक प. पू.संताजी महाराज जगनाडे होते. तिळवन तेली समाजाचे भूषण असलेले संताजी महाराज तुकोबारायांच्या किर्तनातील चौदा प्रमुख झांजकर्या पैकी एक होते!

तेल व्यवसायीकांच्या घरी जन्मलेले संताजी पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यातील चाकणचे रहीवासी होते. त्यांचा जन्म विठ्ठल भक्त श्री.विठोबापंत व माता माथाईंच्या पोटी इसवी सन ८/१२/१६२४ रोजी झाला. ते वारकरी सांप्रदायातील असून विठूरायांचे निस्सिम भक्त होते. जगनाडे परिवाराचा तेल उत्पादन व विक्रीचा व्यवसाय होता. संताजी वयाच्या बाराव्या वर्षी यमुना बरोबर चतुर्भूज झाले. आध्यात्मिक वारकरी सांप्रदायाच्या वैचारिकतेमुळे ते विठ्ठल भक्तीत मग्न झाले. भजन व किर्तनाच्या माध्यमामुळे संसाराचा त्याग केला. त्या कालावधीत किर्तन व अभंगाच्या माध्यमातून जन प्रबोधनाचे कार्य करणार्या तूकोबांचे




किर्तन चाकनला होते.. त्याचा संताजींच्या मनावर प्रभाव पडला. व त्या नंतर गृहत्याग करुन संतश्रेष्ठ तुकोबारायांच्या बरोबर राहू लागले. त्यांच्या बरोबर राहून किर्तनाच्या रंगी रंगले. संतश्रेष्ठ तुकोबांच्या चौदा टाळकर्या पैकी एक प्रमुख टाळकरी होते. संताजीना तुकोबांचे अभंग लिखान करण्याची सवय लागली. त्याकाळातील कांही लोकांना तुकोबारायांचा वाढता जन मानसातील प्रभाव सहन होत नव्हता! त्यामुळे संतशिरोमनी तुकोबांची पवित्र गाथा इंद्रायणी नदीत बुडवून नष्ट करण्याचा प्रयत्न केला. पण तुकोबांचे अभंग संताजीना मुखोद्गत पाठ होते. त्यामुळे तुकोबांची गाथा संताजींनी परत लिखित केली.

यामुळे वारकरी सांप्रदयात संताजी महिराजांचे अढळ स्थान निर्माण झालेले आहे. संताजी महाराजांचा तेल व्यवसाहिकाचा पिढीजात धंदा असल्याने तिळवण तेली समाजात त्यांचे आदराचे स्थान आहे. तुकोबांचा भक्ती सुगंध घेऊन जीवन जगणारे संताजी जगनाडे महाराजांनी कांही अभंगाची निर्मिती करुन वारकरी परंपरेला वेगळा साज चढवला होता.



डॉ.श्याम वा.कुलकर्णी,
महाळूंगे,पुणे







## शामला पंडित दीक्षित यांना लोकशाहीर अण्णाभाऊ साठे साहित्यरत्न पुरस्कार जाहीर !

**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे (प्रदीप बडदे)–** अध्यापनाचे काम करणाऱ्या शामला पंडित (दीक्षित) यांचे आजपर्यंत १६ कवितासंग्रह, १ कथासंग्रह प्रकाशित आहेत, तसेच ३ पुस्तके प्रकाशनाच्या मार्गावर आहेत. त्यांच्या अमृतकुंभ ,अष्टपैलू , दरवळ कवितासंग्रहाला विशेष पुरस्कार मिळाले आहेत. विद्यार्थ्यांनी पुष्पांजली पुस्तकाची हस्तलिखित तयार केली आहेत. त्यांच्या लेखनातून समाजातील वास्तव, स्त्री-जीवनातील संघर्ष आणि मानवी भावभावनांचे संवेदनशील चित्रण आढळते. .त्यांनी प्रणाली प्रकाशनच्या माध्यमातून चाळीसपेक्षा अधिक साहित्यिकांची पुस्तके प्रकाशित केलेली आहेत.त्यांनी ‘‘शामलाक्षरी‘‘ (समान शब्द, अर्थ भिन्न) असलेल्या नवकाव्य प्रकाराची देणगी मराठी साहित्याला दिली आहे. ‘‘शामलाक्षरी ‘‘ हा काव्य प्रकार साहित्यिकात रूढ झाला असून शामलाक्षरी काव्य प्रकारात पाच प्रातिनिधिक काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहे. अध्यापिका म्हणून शालेय स्तरावर नाट्यसंहिता लेखन, दिग्दर्शन त्यांनी केल आहे. सकाळ नाट्यवाचन स्पर्धेत अनेक वेळा यश संपादन केले आहे. पिंपरी चिंचवडचा आदर्श शिक्षक पुरस्कार, मुंबई व धुळे येथील साहित्यरत्न पुरस्कार त्यांना मिळालेले आहेत.

या पुरस्काराबद्दल बोलताना शामला पंडित म्हणाल्या, हा पुरस्कार केवळ माझा नसून, मला प्रेरणा देणाऱ्या सर्व संस्था पदाधिकारी, शिक्षकांचा आणि माझ्या सर्व विद्यार्थ्यांचा आहे. मी यापुढेही सातत्याने लेखन करत राहीन. त्यांच्या साहित्यसेवेमुळे अनेक तरुण लेखकांना प्रेरणा मिळेल अशी आशा व्यक्त करण्यात येत आहे. .


खासदार मा.श्रीरंग बारणे, विधानपरिषद मा .आमदार अमित गोरखे, मा.उमाताई खापरे, कलारंग सांस्कृतिक प्रतिष्ठानचे संस्थापक आमदार माने., माजी आमदार अश्विनीताई जगताप, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या पिंपरी चिंचवड शाखेचे अध्यक्ष भाऊसाहेब भोईर, माजी नगरसेवक शत्रुघ्न काटे यांनी शुभेच्छापर मनोगत व्यक्त करून साहित्यिकांना गौरविले.

त्याप्रसंगी अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष बाळासाहेब रसाळ, अनिल सौंदळे, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, नगरसेविका अनुराधा गोरखे, नगरसेवक शितल शिंदे, भाजपा महिला उपाध्यक्ष सुप्रिया चांदगुडे,नगरसेवक राजेंद्र बाबर, संदीप वाघेरे, अमित गावडे, कैलास कुटे, सुजाता पालांडे, जयश्री गावडे, वैशाली काळभोर, राजू दुर्गे, सामाजिक कार्यकर्ते मनोज सूर्यवंशी, हभप अशोक महाराज गोरे, साहित्य संवर्धन समितीचे अध्यक्ष सुरेश कंक आदी मान्यवर उपस्थित होते. मराठी साहित्यातील त्यांच्या अमूल्य योगदानाबद्दल त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला असून, यामुळे शिक्षण क्षेत्रासह साहित्य विश्वातही आनंदाचे वातावरण आहे.









# आधी वंदू तूज मोरया...

## ।। महागणपती- राजुरचा राजुरेश्वर ।।

**ज्योतिर्मय साहित्य**

मराठवाडा ही संतांची भूमी समजली जाते. या भूमीत अनेक संत-महंतांनी भक्तीचा मळा फुलवला. अनेक श्रध्दास्थाने असणाऱ्या मराठवाड्यात जालना जिल्ह्यातील राजूरचा गणपती हेही असंख्य भक्तांचे श्रध्दास्थान आहे. राजुरेश्वर, महागणपती म्हणून ओळखला जातो.महाराष्ट्रातील प्रमुख गणपती मंदिरात ह्याचा समावेश आहे. जालना जिल्हयातील राजूर हे गणपतीचे पूर्ण पीठ मानले जाते.तर महाराष्ट्रात मोरगांव, चिंचवड व राजूर ही श्रीगणेशाची तीन पूर्ण पिठे तर पद्मालय हे अर्ध पीठ मानले जाते. राजौरी (सध्याचे राजूर) या गावाच्या पश्चिमेला एका देवळात चक्रधर स्वामी थांबत असत.

जालना -भोकरदन राज्यमार्गावर राजूर हे गाव आहे. गणेश मंदिराची रचना गर्भगृह, त्यापुढील अंतराळ व सभागृह अशी पूर्वी असावी. हे मंदिर यादवकालीन असल्याचे मानले जाते. सध्या यादवकालीन गाभारा कायम असून पुढील सभागृह नव्याने बांधण्यात आलेले आहे. यादवकाळात उंच टेकडीवर असलेल्या या जागेत श्रीगणेशाशिवाय शिव व अन्य देवतांची मंदिरे त्याकाळी असावीत. सध्या येथील गणेश मंदिर हे प्रमुख मानले जाते. या मंदिराचे महत्व पेशवे काळापासून वाढत गेले असावे असे मानले जाते. या मंदिराच्या परिसरात असलेली दीपमाळ ही लक्ष वेधून घेणारी आहे. श्री गणेश मंदिराच्या गाभा-यात अखंड दीप प्रज्वलित असतात.काही वर्षा पुर्वी गाभाऱ्यात अनेक समया असत. आता काळानुसार त्यासोबत विजेची रोषणाई असते.ती ही अधिक खुलून दिसते. अशीही आख्यायिका आहे की चिमाजी अप्पांनी मोहिमेवर जातांना गणपतीला नवस केला होता.त्यात त्यानां विजय मिळाल्यावर १०८ नंदादीप देऊन तो नवस फेडला होता.नवसाला पावणारा म्हणून आजही नंदादीप देऊन भाविक नवस फेडतात.

दररोजच या मंदिराच्या परिसरात भाविकांची दर्शनासाठी मोठया प्रमाणावर गर्दी असते. गेल्या कांही वर्षात मंदिर विश्वस्त समितीच्या वतीने या मंदिराचे भव्य आणि अत्याधुनिक स्वरुपात जीर्णोध्दार करण्याचे काम केलेले आहे.अतिशय सुंदर असे मंदिर आहे. जालना, बुलडाणा,नागपूर, धुळे, जळगांव, परभणी, औरंगाबाद इत्यादी अनेक जिल्हयांमधून त्याचप्रमाणे राज्याच्या अन्य भागांमधून आणि राज्याबाहेरचे भाविक प्रचंड संख्येने राजूर येथील श्री गणेशाच्या दर्शनासाठी येत असतात. या मंदिराचा जीर्णोव्दार करतांना मूळ







गाभारा कायम ठेवून तयार करण्यात आलेला आराखडा अतिशय लक्ष वेधक अशा स्वरुपाचा आहे. भाविकांची दरवर्षी वाढणारी गर्दी पाहून हा आराखडा तयार करण्यात आलेला आहे. भाविकांनी दिलेल्या देणग्या आणि दानशूर मंडळीचे सहकार्य घेऊन या मंदिराचा जीर्णोध्दार करण्याचे काम पुर्णत्वास गेले आहे.

राज्याच्या विविध भागातून येथे मोठ्या प्रमाणात येणाऱ्या भाविकांमुळे राजूरच्या विकासालाही गती मिळाली आहे. प्रवाशांसाठी मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधा निर्माण होत आहेत. वाहतूक आणि अन्य साधनांमध्ये वाढ होत असल्याने राजूर येथील बाजारपेठ आणि अन्य व्यापार भरभराटीला आला आहे.

प्राचीन काळापासून गणेश पुराणात राजुर गणपतीचा उल्लेख आहे. सिंदुरासुर राक्षस ऋषीमुनिंना त्रास देत होता. त्यामुळे त्याचा नायनाट करण्यासाठी वरण्यराजाने राजुरेश्वराचा अवतार घेतला. सिंदुरासुराचा वध केला व त्यांचे अवशेष चारही दिशांना फेकून दिले. त्याचा वध केल्यावर त्याचे अवशेष ज्या ठीकाणी पडले त्या त्या ठिकाणी श्री गणेशाचे साडेतीन पिठे आहेत. त्यापैकीच राजुरेश्वर देवस्थान. हे एक उंच टेकडीवर वसलेले असल्याने दुरुन शोभुन दिसते आहे. महाराष्ट्रातील साडेतीन




पिठापैकी एक संपूर्ण शक्ती पीठ तसेच नाभीस्थान म्हणून राजूर गणपती मंदीर नावारुपाला आलेले आहेत. तसेच पुणे येथे चिंचवडला शिर्शस्थान आहे. तर मोरगावला ह्रदयस्थान, तर जळगाव जिल्ह्यात पदमालय येथे पदस्थान असे अडीच पिठे आहेत. त्यापैकी राजुर नाभीस्थान म्हणजेच पोटाचा भाग आहे. व ते संपूर्ण पिठ असल्याचे लौकीक आहे.

जालना शहरापासून सुमारे पंचवीस कि.मी.वर राजुर असुन राजुरहून जवळच विदर्भातील देउळगावराजा आहे.तेथेच प्रसिद्ध बालाजी मंदिर राजुरहून पंचवीस किमीवर आहे. इस.सन. १७२२ मध्ये पेशव्यांनी राजुरेश्वरास नऊ क्विंटलची पंचधातुची घंटा दान केली होती. आजही मंदिरात आहे. त्यामुळे राजुरचे महत्त्व ऐतीहासकालीन असल्याचे सिद्ध होते. या ठिकाणी मंदीरा शेजारी दिपमाळ आहे.

अल्लाउद्दीन खिलजी याने यादवाकडून दौलताबाद किल्ला जिंकला होता. त्यावेळी त्याची नजर राजुर गणपती मंदिरात असलेल्या उंच दिपमाळ वर पडली. व त्याने आपल्या सैन्याला राजुर मंदिरावर आक्रमण करायला सांगितले व नासधूस केली. ती दिपमाळ अजूनही उभी आहे. दरवर्षी फेब्रुवारी महिन्यात येथे सात दिवस अखंड हरीनाम सप्ताहाद्वारे राजुरेश्वराचा जन्मोत्सवानिमित्त मोठी यात्रा भरते. विनायकी,संकष्टी चतुर्थीला ही भाविकांची दर्शनासाठी मोठी गर्दी असते.अशा ह्या गणेशाचे आपण सगळ्यांनी एकदातरी दर्शन घ्यायला हवे....

।। ॐ गं गणपतये नमः ।।

# आमच्या बालपणीचा गणेशोत्सव

**ज्योतिर्मय साहित्य**

माझे वडील शिक्षण खात्यात उस्मानाबाद येथे (आताचे धाराशिव) सन १९६२ साली मुख्याध्यापक पदावर कार्यरत होते. त्याकाळात श्रीगणेशोत्सव घरगुती व सार्वजनिक खूप धुमधडाक्यात साजरा होत असे. प्रत्येकाच्या घरीही श्रीगणपतीबाप्पाच्या शाडूच्या मुर्तीची प्रतिष्ठापना होत असे. काही जण घराच्या छोट्या मोठ्या कोनाड्यात किंवा काही जण लाकडाचे कोरीव नक्षीदार असे मखर तयार करुन त्या मखरात गणपतीच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करीत असत. आमच्या घरीही वडीलांनी एक छान नक्षीदार आकर्षक असे लाकडाचे मखर तयार करुन घेतले होते. त्या मखरावर मग बाजारातून आणलेल्या सोनेरी, लाल, निळ्या व गुलाबी रंगीत, झगमग अशा कागदांची मिश्रण (मिक्स) स्वरूपात आकर्षक अशी सजावट वडील करीत असत. तसेच, त्यावर क्राफ्टच्या कागदांची फुले कात्रीने कापून विविध रंगांची, नक्षींचे फुले वडील मखरावर चिकटवित असत. त्यामुळे, ते मखर विविध रंगांमुळे लाईटच्या प्रकाशात मग मस्त झगमगत असे. ते सर्व करीत असताना मी माझे भाऊ व माझे मित्र टक लावून ते सर्व मातांचे काम पाहात असू. आमचे त्या काळातील ते उत्कृष्ट मनोरंजनाचे साधन होते. ही सर्व कामे गणेशोत्सवाच्या चार दिवस आधी केली जात असत. ज्यादिवशी श्रीगणेश चतुर्थी असेल त्यादिवशी मग, सकाळी सकाळी आम्हीं भावंडे स्नान करुन मग वडिलांसोबत गणपतीची मुर्ती आणण्यासाठी गणपती मुर्तीं असलेल्या दूकानात जात असू. खाकी चड्डी, पांढराशुभ्र सदरा (शर्ट) चड्डीत सदरा खोचून (इन करुन)


डोक्यावर पांढरी टोपी घालून कपाळावर कुंकू लावून मोठ्या आनंदाने जात असू. तिथे दूकानात गेल्यावर मग वडील त्या दूकानातील एक एक मुर्तीचे निरिक्षण करीत असत. घरी घरगुती गणपती साधारणपणे एक फुटाच्या आतील मुर्ती खरेदी करुन त्याची प्रतिष्ठापना करण्याची पध्दत, परंपरा असल्यामुळे वडील त्यादृष्टीने मुर्तीची पाहणी करीत असत. त्या मुर्तीमध्ये एक गोष्टी आहेत का ते वडील पाहात असत. प्रथमतः गणपतीच्या मुर्तीमध्ये गणपतीच्या कपाळावर उभे गंध आहे का ते पाहायचे. नंतर अंगावर जानवं आहे का ते पाहात. त्यानंतर अंगावर उपरणे आहे का, सोवळे आहे का, ते कोणत्या रंगाचे आहे हे पाहात. मुख्य म्हणजे गणपतीची सोंड उजव्या बाजूला आहे का डाव्या बाजूला आहे ही गोष्ट वडील नीट लक्ष देऊन पाहात असत. कारण, घरगुती गणपतीची मुर्ती ही डाव्या सोंडेचीच असावी लागते.तसेच, गणपतीच्या चार हातांपैकी दोन हातात आयुधे आहेत का! आणि दूस-या दोन हातांपैकी एका हातात मोदक आहे का ते पाहात. तसेच, एक हात गणपतीचा भक्तांना आशिर्वाद देण्यासाठी असतो, तो तसा आहे का हे पाहात. तसेच, मुख्य म्हणजे गणपतीचे वाहन उंदीर मुर्तीवर पायाजवळ आहे का हे पाहात. अशा सर्व गोष्टीं

बारकाईने पाहिल्यानंतर मग आकर्षक असणारी आणि दिसणारी गणपतीची मुर्ती वडील विकत घेत असत. मग, आम्ही सर्व भाऊ गणपतीची मुर्ती मुर्तीवर नवीन वस्त्र पांघरुन गणपती बाप्पा मोरया! मंगलमुर्ती मोरया! एक दोन तीन चार! गणपतीचा जयजयकार!म्हणत घरी घेऊन येत असत. घरी आल्यावर पाटावर मुर्ती ठेवून पाय धुऊन आईने दिलेल्या पंचपाळातील अक्षता पाटावर ठेवून त्यावर गणपती बाप्पाची मुर्ती ठेवून त्यावर हळद,कुंकू, अक्षता वाहात असू. पून्हा एकदा गणपती बाप्पा मोरया ! मंगलमुर्ती मोरयाचा जयघोष तीन चार वेळा होत असे. त्यानंतर सगळ्या देवांची पूजा झाल्यावर मग, मखरात अक्षता वाहून गणपतीची मुर्ती ठेवली जात असे. मग, यथाविधीप्रमाणे वडील गणपतीची श्री गणपती अथर्वशीर्षासहीत पूजा करीत असत. गणपतीची पूजा झाल्यानंतर मग, महानैवेद्य दाखविला जात असे. त्यानंतर मग, खणखणीत आवाजात वडील आरत्या म्हणत असत. त्यांच्यासोबत आम्हीही सर्वं कुटुंबीय सदस्य टाळ वाजवून आरत्या म्हणत असू. अनंत चतुर्दशीपर्यंत रोजच मग, सकाळ, संध्याकाळ गणपतीची आरती होत असे. गणेशोत्सवाच्या या कालावधीत सार्वजनिक गणपती मंडळांमध्ये ही काही सांस्कृतिक कार्यक्रम सादर होत असत. सविस्तर मित्रांनी बालनाटक करायचे ठरवले. तेव्हा, आम्ही जिथे राहातं होतो तो वाडा दगडी बांधकामाचा होता. तसेच, सागवानी लाकडाचे दरवाजे व दगडी खांब उपयोगात आणून तो वाडा बनविलेला होता. त्या वाड्यात घरमालकासह पाच, सहा भाडेकरु राहात होते. त्यामुळे, तिथं मोकळ्या ओस-या (मोठ्या ओट्यासारखी बसायची जागा) दोन तीन होत्या. त्यातील एका ओसरी मध्ये आम्ही बालमित्रांनी एक नाटक करायचं ठरविलं. पण, त्यासाठी स्टेज करणं आवश्यक होतं. मग, त्याकरिता दोन साड्यांची आवश्यकता होती.

तसेच, बालसाडीची गरज होती. तसेच, एक कुडता पायजम्याची आवश्यकता होती. आणि मुकुट व मोरपिसाची आवश्यकता होती. पण, हे आणायचं कोठून !तर त्यासाठी मी माझ्या प्रमोद नावाच्या मित्राला सांगितले. लाडाने आम्ही त्याला पम्या म्हणत असू.आमच्या वाड्यात चिंगी नावाची एक मुलगी तिच्या आईबाबांसोबत राहात होती. राधा आणि कृष्ण यांच्या पात्रासाठी उपरोक्त गोष्टींची खूप आवश्यकता होती.म्हणून पम्याला मी म्हणालो पम्या तुझ्या घरातून कपाटातून तुझ्या आईच्या दोन साड्या घेवून ये. तसेच, राधेच्या साडीसाठी म्हणून तुझ्या बहिणीची एक रंगीत ओढणी घेवून ये. म्हणजे, आपल्याला स्टेज तयार करता येईल.तसं होय नाही म्हणत पम्या साड्या आणण्यास तयार झाला. त्याप्रमाणे त्याच्या आईच्या नकळत कपाटातून दोन रंगीत साड्या आणि एक रंगीत ओढणी पम्या घेवून आला. कृष्णाच्या मुकुटासाठी आम्ही मित्रांनी खाऊसाठी दिलेल्या पैशातून दूकानातून खपटाचा एक सोनेरी मुकुट



आणि एक लाकडी बासरी खरेदी केली. मग आम्ही पाच सहा मित्रांनी मिळून ओसरीच्या आतील तिन्ही बाजूंनी दोन साड्या दोरीने बांधून लावल्या. अशा प्रकारे स्टेज तयार केल्यानंतर मग, कृष्ण झालेल्या




मित्राला कुडता व पायजमा घातला. नंतर डोक्यावर मोरपीस लावले.कपाळावर सोनेरी मुकुट बांधला. त्यांच्या हातात बासरी दिली. ती बासरी कृष्णदेवासारखी धरण्यास सांगितले. तसेच, राधा झालेल्या चिंगीला तिच्या घातलेल्या फ्रॉकवरच साडीसारखी ओढणी नेसविली. मग, आमचे बालनाटक सुरु झाले. आठदहा दिवसांपूर्वीच नाटकातील संवादाची प्रॅक्टीस आम्ही सुरु केली होती. त्यानुसार श्रीगणेश चतुर्थीच्या आदल्या दिवशी रंगीत तालिमही झाली होती. श्रीगणेश चतुर्थीच्या दिवशी गणपती देवाची पूजाअर्चा,

आरती झाल्यानंतर व सर्वांची जेवणं झाल्यावर

मग, पाच वाजता आम्ही बसविलेल्या नाटकास सुरुवात झाली. नाटक पाहण्यासाठी काही बाल मित्रमंडळी व मैत्रीणीसुध्दा आल्या होत्या. त्यानुसार, कृष्ण व राधेचे संवाद सुरु झाले. नंतर कृष्ण व राधेचे भक्तीगीत सुरु झाले. पून्हा कृष्ण व राधेचे संवाद सुरु झाले. आमचे नाटक चांगलेंच रंगात आले होते. तितक्यात, अॅटमबाँब

सारखा आवाज व्हावा असा जोराचा आवाज आला आणि बघतो तर काय! समोर पम्याची आई तरातरा चालत येत असलेली दिसली. जशी काही देवीच त्याच्या आईच्या अंगात आलेली होती. अरे टारगट कार्ट्यांनो, तुम्हाला काही अक्कल बिक्कल आहे का नाही. पून्हा पम्याला बघितल्यावर तर त्याच्या आईचा पारा आणखीनंच वाढला. त्याच्यावर जोरात ओरडत

म्हणाली, कार्ट्या माझी नजर चुकवून तू हे असले रिकामटेकडे उद्योग करतोस काय! थांब ! तू घरी ये मग, तुझ्याकडे चांगलंच बघते. असं त्याच्या आईने म्हणतांच पम्याची चांगलीच घाबरगुंडी उडाली. मग, त्यांच्यासोबत घाबरून आम्ही सगळी मित्रमंडळीही तिथून धूम पळालो. त्यादिवशी रात्री मात्र पम्याच्या आईने त्याची चांगलींच धुलाई केली. हे नंतर आम्हाला दूस-या दिवशी त्याच्याकडून समजले. नंतर खूप दिवस आम्ही हे आठवायचो आणि गप्पा मारीत मारीत हसायचो! अशा ह्या श्रीगणेश चतुर्थीच्या बालपणीच्या रम्य व आनंददायक अशाआठवणी आहेत.

गणपती बाप्पा मोरया !
मंगलमुर्ती मोरया !

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559